श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-७, अंक-१ | जानेवारी-२०१९ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८ |

## डेरवण रुग्णालयात ग्रामीण भारतातील शल्यविशारद संघटनेचे अधिवेशन

'अखिल भारतीय ग्रामीण शल्यचिकित्सक संघटना (ARSI)' ही आरोग्यक्षेत्रातील महत्त्वाची सेवाभावी संस्था ग्रामीण भागातील शल्यविशारदांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रतिवर्षी एक परिषद भरवीत असते. या वर्षीची सव्वीसावी परिषद भ. क. ल. वालावलकर रुग्णालय व संशोधन केंद्र आणि ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, डेरवण येथे दिनांक २३ ते २५ नोव्हेंबर २०१८ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती.

दि. २३ रोजी सायंकाळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे 'कोल्हापूर कॅन्सर सेंटर'चे संचालक डॉ. सुरज पवार यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. संस्थेचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून आपल्या स्वागतपर भाषणात, 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट' व 'श्री सितारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट'ने सन १९६९ पासून सामाजिक, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रात केलेल्या कार्याचा परिचय सर्वांना करून दिला. ग्रामीण भागात वैद्यकीय क्षेत्रात काम करताना अंधश्रद्धा, रूढी व परंपरा यांचा समाजमनावर असलेला परिणाम, दुर्गम नैसर्गिक परिस्थिती, दळवळणाच्या साधनांचा आभाव, लोकांमध्ये अत्याधुनिक वैद्यकीय उपचारांबाबत असलेली भीती यामुळे वैद्यकीय सेवा पुरविण्यात येणाऱ्या अडचणींचाही त्यांनी उहापोह केला. अशा परिस्थितीत या संस्था गेली ५० वर्षे मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत गरजांचा विचार करून त्यांची पूर्तता होण्यासाठी ग्रामीण भागात कार्य करीत आहेत. अशा परिषदांमधून शल्यविशारदांना आपले वैद्यकीय क्षेत्रातील ज्ञान अद्ययावत ठेवता येईल तसेच नवनव्या संकल्पनांची देवाणघेवाण होऊन त्यांचे ज्ञानाचे क्षेत्र विस्तारेल असे प्रतिपादन करून त्यांनी अधिवेशनात सहभागी झालेल्या सर्वांना व अधिवेशनाला शुभेच्छा दिल्या.



*दीप प्रज्वलन करताना - (डावीकडून) डॉ. राजेश टोणगांवकर, डॉ. श्रीपाद बाणावली, डॉ. राम प्रभू, डॉ.सुवर्णा पाटील, श्री. विकासराव वालावलकर, डॉ. ज्ञानराज जेसुडियन, डॉ. सुरज पवार*

'ARSI' चे अध्यक्ष डॉ. ग्यानराज जेसुडीयन यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की या दुर्गम आणि ग्रामीण भागात एवढे मोठे वैद्यकीय कार्य सुरू आहे यावर बाहेर कोणाचा सहजपणे विश्वास बसणार नाही. अशा कार्यशाळांमधून कमीतकमी खर्चात अत्याधुनिक यंत्रसामग्री वापरून उत्कृष्ट रुग्णसेवेसाठी नवनवीन कल्पना व तंत्रज्ञान कसे राबविले जाते याचे ज्ञान मिळते. संस्था करीत असलेल्या कार्याचा गौरवपूर्वक उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केला.

'ARSI' चे सहसचिव डॉ. राम प्रभू म्हणाले की या कार्यशाळेला मिळालेला मोठा प्रतिसाद पाहून आनंद वाटला आणि मला हा विश्वास आहे की या कार्यशाळेत सहभागी विविध शाखांमधील तज्ज्ञ आणि सर्व अद्ययावत सुविधांची संस्थेतर्फे करण्यात आलेली उपलब्धता पाहता या त्रिदिवसीय कार्यशाळेत सहभागी झालेला प्रत्येक जण काही ना काही बोध घेऊनच परत जाईल! यानंतर संस्थेचे विश्वस्त व मुंबई येथील प्रतिथयश अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. सुधीर जोशी यांनी या कार्याशाळेसंबंधी आपले मनोगत व्यक्त केले.

समारंभाचे मुख्य अतिथी डॉ. सुरज पवार, व्यवस्थापकीय संचालक, कोल्हापूर कॅन्सर सेंटर आपल्या भाषणात म्हणाले, "प्रत्येक नागरिकाला निरामय जीवनाचा अधिकार हा संविधानाने दिलेला मूलभूत अधिकार असूनही सुविधांच्या कमतरतेमुळे, तज्ज्ञांच्या अभावामुळे देशातील ७०% जनता ही या मूलभूत अधिकारांपासून वंचित राहते. शासकीय सुविधांचा आभाव असल्याने विविध सामाजिक संस्थांनी या कार्याला हातभार लावल्यास मूलभूत अधिकारास वंचित असलेल्या रुग्णांना याचा नक्कीच लाभ होईल. शहरी जगातील मोहमयी जीवनाचा त्याग करून ग्रामीण भागातील जनतेचे उतराई होण्यासाठी सर्व ग्रामीण शस्त्रक्रिया तज्ज्ञांनी आपली सेवा समर्पित करणे ही काळाची गरज आहे. तसेच जगप्रसिद्ध तत्त्ववेत्ता पावलो कोएलो यांचे 'When you want something, all the universe conspires in helping you to achieve it. Each thing has to transform itself into something better, and to acquire a new Personal Legend, until, someday, the Soul of the World becomes one thing only' हे विचार उद्धृत केले. यानंतर संस्थेच्या वतीने वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी आभार प्रदर्शन केले.

दि. २३ रोजी सकाळी एक महत्त्वाचे व्याख्यानसत्र घेण्यात आले. या सत्रात अखिल भारतीय ग्रामीण शल्यचिकित्सक संघटनेचे अध्यक्ष डॉ. ज्ञानराज जेसुदीयन यांनी आधुनिक 'पोटाची वायुविरहीत दुर्बीणीद्वारे शस्त्रक्रिया (GILLS)' ही अत्यल्प तंत्रज्ञान वापरून शस्त्रक्रिया करण्याची पद्धती विशद करून सांगितली. डॉ. अभय देसाई यांनी 'मूत्रपिंड शस्त्रक्रिया', डॉ. वसंत कवाडे यांनी 'गर्भावस्थेतील उदरशूल', डॉ. पवन कोहली यांनी 'गुडघा प्रत्यारोपण' व डॉ. सुनील नाडकर्णी यांनी 'पाठीच्या कण्याची शस्त्रक्रिया' आणि डॉ. नेताजी पाटील यांनी 'क्ष-किरण' शास्त्रातील विशेष केसेस मांडल्या. गुंतागुंतीच्या वैद्यकीय समस्या व त्यावर वालावलकर रुग्णालयात उपलब्ध सेवा यावर सविस्तर चर्चा झाली. डॉ. सुवर्णा पाटील यांनी




*आपले विचार व्यक्त करताना अध्यक्ष डॉ. सुरज पवार, बसलेले उजवीकडून - डॉ.सुवर्णा पाटील, डॉ. सुनील नाडकर्णी, डॉ. टोणगावकर, डॉ. ज्ञानराज जेसुडीयन, डॉ. राम प्रभू, डॉ. श्रीपाद बाणावली, डॉ. सुधीर जोशी, डॉ. विजय डोंबले.*




*अधिवेशनासाठी आलेल्या इंग्लंड येथील लीड्स युनिव्हर्सिटीतील तज्ज्ञ शल्य विशारदांसमवेत डॉ. सुनील नाडकर्णी, श्री. विकासराव वालावलकर (डावीकडे) आणि डॉ. श्रीपाद बाणावली व डॉ. सुधीर जोशी (उजवीकडे)*

सर्पदंश व विंचूदंश उपचारपद्धतीची कार्यशाळा घेतली. उपस्थितांना विविध सर्पजातींची ओळख होण्याकरिता सर्प संग्रहालय खुले करून देण्यात आले होते. मुंबईच्या हिंदुजा रुग्णालयाच्या डॉ. प्रमिला कुरकुल यांनी 'वेदनाशमन' तर पुण्याहून डॉ. श्रीधर कानिटकर यांनी 'मुखाचे कर्करोगजन्य आजार' या विषयांवर व्याख्यान दिले.

दुसऱ्या दिवशी मुंबईच्या हिंदुजा रुग्णालयातील यकृत प्रत्यारोपण सर्जन डॉ. सुदीप शाह यांनी 'आधुनिक शल्य तंत्रज्ञान व त्याचे ग्रामीण हस्तांतरण' या विषयावर माहिती दिली. 'रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्स ऑफ एडिन्बरा' ही विश्वविख्यात संस्था वालावलकर रुग्णालय येथे शल्यकार्यशाळा आयोजित करते. त्याविषयी वेल्स, युनायटेड किंग्डम येथील डॉ. नंदन कानविंदे यांनी सविस्तर माहिती दिली. डेरवण रूग्णालयाच्या वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट'च्या विविध क्षेत्रातील सामाजिक कार्याची माहिती उपस्थित मान्यवरांना करून दिली.

टाटा मेमोरियल सेंटरचे 'डिन ऑफ द ॲकॅडेमी' व मेडिकल ऑन्कॉलॉजी विभागप्रमुख, महाराष्ट्राच्या महामहीम राज्यपालांचे वैद्यकीय सल्लागार डॉ. श्रीपाद बाणावली यांनी अत्याधुनिक व किफायतशीर 'मेट्रोनॉमिक किमोथेरपी' या विषयावर व्याख्यान दिले. डॉ. गजानन कानिटकर यांनी 'कर्करोग शस्त्रक्रियेत होणारे बदल आणि विकास' याचा आढावा घेतला. अखिल भारतीय ग्रामीण शल्यचिकित्सक संघटनेची मानाची पावती समजल्या जाणाऱ्या 'डॉ. बालू शंकरन व्याख्यान पारितोषिका'चा सन्मान या वर्षी 'कोल्हापूर कॅन्सर सेंटर'चे संचालक डॉ. सुरज पवार याना देण्यात आला. त्यांच्या आजवरच्या यशस्वी प्रवासाचा मार्ग त्यांनी या निमित्ताने उलगडून सांगितला. याप्रसंगी चांदीचे तबक देऊन डॉ. पवार यांचा गौरव करण्यात आला.

युनायटेड किंग्डममधील प्रख्यात 'लीड्स विश्वविद्यालय' येथील प्राध्यापक डेविड जयने यांनी 'विकसनशील देशांसाठी शल्यशास्त्रात नवीन तंत्रज्ञान व विकासासाठी लागणारे बदल' या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी या क्षेत्रात सुरू असलेल्या विविध उपक्रमांची ओळख करून दिली आणि मदतीचे आश्वासन दिले.

डॉ. संजीब मुखोपाध्याय यांनी स्त्रीरोगशास्त्रात होणाऱ्या गैरव्यवहारांची माहिती देऊन त्यावर ठोस शासकीय उपाय करण्याची मागणी केली. प्लास्टिक सर्जन डॉ. स्वर्ण अरोरा यांनी 'चेहऱ्यावरील दुखापती आणि त्याचे उपचार' या विषयावर मार्गदर्शन केले. धारवाड येथील क्ष-किरण शास्त्रज्ञ व प्राचार्य डॉ. श्यामसुंदर जोशी यांनी 'छातीच्या दुखापती आणि निदान' यावर समर्पक व्याख्यान दिले. डॉ. श्रीधर कानिटकर यांनी 'डॉ. ॲटिया परिसंवादा'चे संचालन केले. त्यात डॉ. सुदीप शाह व डॉ. निखिल हुल्याळकर यांनी अधिक रंजकता आणली. 'पित्ताशयाची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया व त्यातील बारकावे' तज्ज्ञ मंडळींनी प्रश्नोत्तर स्वरूपात मांडले.

आपल्यात नवनवोन्मेषशाली कल्पनाशक्ती दडलेली असते तिला शोधण्याचे मार्ग नवी दिल्ली येथील 'एम्स' चे प्राध्यापक डॉ. प्रशांत झा यांनी विवरण करून सांगितले. प्रशांत झा हे डॉक्टर, इंजिनिअर,




*'आर्सिकॉन २०१८' स्मरणिका प्रकाशन समारंभ (डावीकडून) डॉ. सुधीर जोशी, डॉ. श्रीपाद बाणावली, डॉ. राम प्रभू, डॉ. सुरज पवार, डॉ. ज्ञानराज जेसुडीयन, डॉ. राजेश टोणगांवकर, श्री. विकासराव वालावलकर, डॉ. सुनील नाडकर्णी, डॉ. सुवर्णा पाटील*

संशोधक, उत्तम अध्यापक, उद्योजक आणि वैद्यकीय विषयांवर लिहिणारे लेखक व संपादक असे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहे. आय. आय. टी. कानपूर, पटना मेडिकल कॉलेज तसेच अमेरिकेतील नामांकित हार्वर्ड आणि स्टॅनफोर्ड विश्वविद्यालयात अध्ययन केलेले डॉ. झा सध्या भारतातील अग्रगण्य 'एम्स्' रुग्णालयात 'बायोडिझाइन स्कूल' चे संस्थापक प्राचार्य आहेत. 'किंग्ज् कॉलेज, लंडन' येथेही ते अध्यापनाचे कार्य करतात. त्यांनी रविवारी परिषद संपल्यानंतर विशेष कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला शास्त्रज्ञ, वैद्यकीय महाविद्यालयीन विद्यार्थी, तज्ज्ञ डॉक्टर्स, इंजिनिअर्स, पुणे व गुहागर येथील इंजिनिअरिंग कॉलेजचे विद्यार्थी यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. सायंकाळी एस. व्ही. जे. सी. टी. च्या शाळेतील छोट्या विद्यार्थ्यांनी व नर्सिंग कॉलेजमधील विद्यार्थिनी व शिक्षक यांनी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाने आबालवृद्ध स्थानिक परदेशी पाहुणेदेखील मंत्रमुग्ध झाले.

तिसऱ्या दिवशी डॉ. सागर जावळे यांनी 'स्टेम सेल' या आधुनिक उपचारपद्धतीविषयी ग्रामीण भागातील आपले अनुभव सांगितले. नवी




*अधिवेशनात आपले विचार प्रकट करताना 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट'चे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर*

मुंबई येथील प्राध्यापक डॉ. ज्ञानेश बेलेकर व डॉ. सुकुमार मैती यांनी 'पोटातील क्षयरोगा'च्या उपचारपद्धतीत होणारे बदल याविषयी माहिती दिली. टाटा कर्करोग रुग्णालयाचे डॉ. सुयश कुलकर्णी यांनी 'बायॉप्सी' या विषयातील तर पुण्याचे स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. पंकज कुलकर्णी यांनी 'वंध्यत्व' या विषयातील, विशेषत: 'गर्भाशयाचे प्रत्यारोपण' या संबंधी नवीन तंत्रज्ञानाची माहिती दिली. मुंबईच्या हिंदुजा रुग्णालयातील डॉ. आनंद जोशी यांनी दुर्बिणीद्वारे अन्ननलिकेच्या शस्त्रक्रियेविषयी माहिती दिली. डॉ. आनंद नाडकर्णी आणि डॉ. प्रणव शामराज यांनी ग्रामीण क्षेत्रात हृदयरोग निवारण केंद्र उभे करतानाचे वालावलकर रुग्णालयातले आपले अनुभव कथन केले.

कार्यक्रमाचे अखेरचे सत्र प्रत्येक कार्यरत डॉक्टरांसाठी मोलाचे होते. ग्रामीण शल्यचिकित्सा व ग्रामीण परिस्थितीला साजेसा न्यायवैद्यक सल्ला देण्यासाठी न्यायाधीश श्री. प्रदीप जोशी, पोलिस सर्जन डॉ. श्रीधर पाटील, 'के ई एम' रुग्णालयातील न्यायवैद्यक सहव्याख्याता डॉ. रवींद्र देवकर आणि 'राज्य ग्राहक समस्या निवारण संघा'चे डॉ. संतोष काकडे उपस्थित होते. अधिवेशनात सहभागी देशविदेशातील विविध मान्यवरांनी श्रीक्षेत्र डेरवण येथील शिव समर्थ गड, क्रीडा संकुल व हेल्थ पार्क तसेच रुग्णालयाच्या विविध उपक्रमांची पाहणी करून माहिती घेतली. या कार्यशाळेसाठी देशाच्या विविध भागातून सुमारे ३०० शल्यविशारद व इंग्लंड येथील 'लीड्स युनिव्हर्सिटी'चा २५ डॉक्टरांचा चमू उपस्थित होता.

डेरवण रुग्णालयात एका राष्ट्रस्तरीय परिषदेचे आयोजन हा व्यवस्थापनाच्या दृष्टीने आव्हानात्मक अनुभव होता. येणारे प्रतिनिधी देशाच्या विविध भागातून आणि परदेशातूनही आलेले होते. उपस्थित पाहुण्यांच्या निवास व भोजनाची उत्तम व्यवस्था 'चित्रकूट' या इमारतीत केलेली होती. परिषदेच्या आयोजनाबद्दल सर्वांनीच संतोष व्यक्त केला.

# जानेवारी २०१९ मध्ये डेरवण रुग्णालयात तज्ज्ञ ब्रिटिश डॉक्टरांचे शस्त्रक्रिया शिबिर

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी जानेवारी २०१९ मध्ये डेरवण येथे वालावलकर रुग्णालयात दि. २६ जानेवारी ते दि. ३ फेब्रुवारी २०१९ पर्यंत ब्रिटिश डॉक्टरांचे भव्य शस्त्रक्रिया शिबिर होणार आहे.

इंग्लंड येथील नामवंत भूलशास्त्र तज्ज्ञ डॉ. संजय देशपांडे यांच्या सहकार्याने गेली १२ वर्षे हे शिबिर आयोजित करण्यात येते. या शिबिरासाठी इंग्लंड येथील वैद्यकीय क्षेत्रातील निरनिराळ्या विषयांचे नामवंत तज्ज्ञ डॉक्टर्स, परिचारिका, बायोमेडिकल इंजिनीयर सेवाभावी वृत्तीने आणि स्वयंस्फूर्तीने सहभागी होतात. या शिबिरासाठी डॉ. लान्स कोप, डॉ. रिचर्ड कुपर, डॉ. डी. सिक्सस्मिथ व डॉ. जाईन रिचर्डसन हे रेडिओलॉजी तज्ज्ञ, डॉ. पिटर टायस, डॉ. संजय देशपांडे, डॉ. रिबेका पारकर, डॉ. नर रुबीस, डॉ. किरण अहमद, डॉ. डेरेक जॉनसन हे भूलशास्त्र तज्ज्ञ, डॉ. प्रवीण मेनेझीस, डॉ. स्टुअर्ट मॅक्राकेन, डॉ. इयान इंगेल्स हे युरोलॉजिस्ट, श्री. जॉन वॉल व ब्रदले वॉल हे बायोमेडिकल इंजिनीयर, डॉ. विश भट्टाचार्य, डॉ. एलेनॉर फ्रिमन, डॉ. शेली क्वान्ट्रिल हे जनरल सर्जन, डॉ. भास्कर गुप्ता, कॉथ इटस व रॉरी निकोलसन हे नेत्ररोग तज्ज्ञ, डॉ. इयान थॉम्पसन, डॉ. मुकुंद देगलूरकर हे अस्थिशल्य विशारद, डॉ. मीना अगरवाल या लहान मुलांच्या शल्य विशारद, व इन्टेन्सीव्ह केअर तज्ज्ञ कॅटी लॅंबार्ट व डायने फिट्राकीस आणि इतर तज्ज्ञ सहभागी होणार आहेत.

इंग्लंड येथून येणारे हे सर्व तज्ज्ञ डॉक्टर मोतीबिंदू, कृत्रिम भिंगारोपण, मूतखडे व प्रोस्टेट ग्रंथी व मूत्रमार्गातील अडथळे, मणक्यावरील ओपन व दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया, गुडघ्याच्या आर्थ्रोस्कोपी व सांधा बदलणे व खुबा बदलणे या शस्त्रक्रिया, सर्व प्रकारच्या प्लॅस्टिक सर्जरी (भाजलेले व्रण, चेहऱ्यावरील डाग, खुणा व विद्रुप चेहरा), कान नाक व घश्याच्या शस्त्रक्रिया, अॅपेंडिक्स, अल्सर, थायरॉईड, हायड्रोसील, पित्ताशयातील खडे, मूळव्याध, स्त्रियांच्या ओव्हेरियन सिस्ट, ट्युमर व गर्भाशयावरील शस्त्रक्रिया या व अशा अनेक शस्त्रक्रिया हे येणारे सर्व डॉक्टर करतात.

गेल्या १२ वर्षात या परदेशातून येणाऱ्या डॉक्टरांनी सुमारे ३००० ते ३५०० यशस्वी शस्त्रक्रिया केल्या आहेत. विशेष म्हणजे केवळ कोकणातीलच नव्हे तर बाहेरच्या अनेक जिल्ह्यातूनही या महाशस्त्रक्रिया शिबिरासाठी रुग्ण येतात. हे डॉक्टर्स अत्यंत नि:स्पृहतेने आणि तळमळीने रुग्णसेवा करतात. भाषेची अडचण असूनही सर्वांना सौहार्दाची, आपलेपणाची आणि प्रेमाची वागणूक देऊन सर्वांचे मन जिंकून घेतात. गेली अनेक वर्षे हे डॉक्टर्स डेरवणला येत असल्यामुळे रुग्णांमध्ये त्यांच्याविषयी एक विश्वासाची भावना निर्माण झाली आहे.

या महाशिबिरामध्ये सर्वप्रकारच्या शस्त्रक्रिया अत्यंत अल्प दरात केल्या जातात. बिलातील सवलतीसाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड, तहसिलदारांचा उत्पन्नाचा दाखला, दारिद्र्य रेषेखालील लोकांनी ग्रामसेवकांचा दाखल आणणे आवश्यक आहे. 'महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने'चा लाभ ज्या रुग्णांना घ्यायचा असेल त्या रुग्णांनी शिबिरापूर्वी किमान ८ दिवस आधी रुग्णालयातील 'महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने'च्या कार्यालयाशी संपर्क साधावा.ज्या रुग्णांचे मेडिक्लेम, इन्शुअरन्स असेल अशा रुग्णांनी रुग्णालय व्यवस्थापनास आगाऊ सूचना द्यावी. गरजू रुग्णांनी या संधीचा जरूर लाभ घ्यावा असे आवाहन रुग्णालय व्यवस्थापनाने केले आहे.




*२०१८ साली आलेले ब्रिटिश वैद्यकीय पथक, डॉ. सुवर्णा पाटील यांच्यासमवेत*

# इंग्लिश मिडियम स्कूल, डेरवण येथे राष्ट्रीय गणित दिवस उत्साहात साजरा

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट इंग्लिश मिडियम स्कूल डेरवण येथे, थोर भारतीय गणिती श्रीनिवास रामानुजन यांचा जयंती दिन, २२ डिसेंबर हा ‘राष्ट्रीय गणित दिन’ उत्साहात साजरा केला गेला.

यानिमित्त विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गणित प्रतिकृतींच्या प्रदर्शनाचे उदघाटन शाळेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून व श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती प्रज्ञा पारकर व सर्व शिक्षक वर्ग उपस्थित होता. या प्रदर्शनामध्ये विविध गणिती मनोरंजनात्मक खेळ, गणित अभ्यासक्रमावर आधारित जवळपास साठ प्रतिकृती विद्यार्थ्यांनी सादर केल्या. सहभागी विद्यार्थ्यांना त्यांच्या गणित शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले. सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी या प्रदर्शनाचा आनंद घेतला व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रतिकृतींची स्पर्धा दोन गटांत घेतली गेली.

लहान गटात (इ. ५ वी ते ७ वी) प्रणव भुवड (Finding the day of any date) प्रथम क्रमांक, वेदांत पवार (Equation fun game) द्वितीय क्रमांक, शिवानी बारपटे (Eureka game of





विद्यार्थ्यांनी केलेल्या विविध गणिती प्रतिकृती

maths concepts) तृतीय क्रमांक तर मोठया गटात (इ. ८ वी ते इ. १० वी) राजसी माने, (Napier bones) प्रथम क्रमांक, श्रीया पाकळे व श्रावणी कोल्हापूरे (Factorisation) द्वितीय क्रमांक, रूपल पटेल व रसिका कवितके (Treasure Island) तृतीय क्रमांक हे विजेते ठरले. या प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनामध्ये गणिताचे स्थान व महत्त्व समजण्यास तसेच गणित विषयामध्ये आवड निर्माण होण्यास निश्चतपणे मदत झाली.

तसेच ‘गणित प्रश्नमंजुषा स्पर्धे’चे सुध्दा आयोजन केले गेले. ही स्पर्धा लहान गट (इ. ५ वी ते ७ वी) व मोठा गट (इ. ८ वी ते १० वी )अशी घेतली गेली. प्रत्येक गटामध्ये एमराल्ड, रूबी, सफायर व टोपाझ अशा चार विभागांमध्ये ही स्पर्धा झाली. लहान गटात सफायर हाऊस तर मोठया गटात रूबी हाऊस विजेते ठरले. या स्पर्धेमुळे तोंडी गणिती क्रिया व कमीत कमी वेळेत गणित सोडवण्याची पध्दत व सवय किती महत्त्वाची आहे हे विद्यार्थ्यांना समजले. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांबरोबरच शाळेतील इतर विद्यार्थी व शिक्षकवर्ग यांनी या स्पर्धेचा आनंद घेऊन गणित दिन उत्साहात साजरा केला.




सौ. शरयू यशवंतराव प्रदर्शनाची पाहाणी करताना




विद्यार्थ्यांनी केलेली एक प्रतिकृती



आपल्या प्रतिकृती अभिमानाने दाखविताना विद्यार्थी

# ‘एसव्हीजेसिटी’ क्रीडासंकुलात राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धांचे आयोजन

क्रीडासंकुलातील बंदिस्त स्टेडियममध्ये महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे तसेच रत्नागिरी जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्याकडून शालेय राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धांचे आयोजन दि. ०९ डिसेंबर ते १२ डिसेंबर २०१८ या काळात करण्यात आले. सदर स्पर्धेसाठी नागपूर, अमरावती, मुंबई, पुणे, नाशिक, लातूर, औरंगाबाद आणि कोल्हापूर विभागातील एकूण १९२ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. ही स्पर्धा १४, १७, १९ वयोगटातील मुले आणि मुली यांमध्ये भरविण्यात आलेली आहे. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे पोल मल्लखांब, रोप मल्लखांब या दोन्ही क्रीडा प्रकारांची चित्तथरारक प्रात्याक्षिके क्रीडाप्रेमींना पाहण्यास मिळाली.

या स्पर्धेसाठी शिवछत्रपती पुरस्कार विजेते श्री. श्रेयस म्हसकर, सचिव, महाराष्ट्र मल्लखांब संघटना, शिवछत्रपती पुरस्कार विजेते श्री. माया मोहिते, तांत्रिक समिती सदस्य महाराष्ट्र राज्य, शिवछत्रपती पुरस्कार विजेते श्री. विश्वतेज मोहिते, सहसचिव, महाराष्ट्र राज्य, शिवछत्रपती पुरस्कार विजेते श्री. अनिल नागपुरे, सदस्य महाराष्ट्र राज्य मल्लखांब संघटना तसेच मल्लखांब खेळातील शिवछत्रपती पुरस्कार विजेते श्री. शांताराम जोशी उपस्थित होते.

निहाल विचारे, तेजस धनावडे, श्रीराम भागवत, अमेय सूर्यवंशी अशा अनेक राष्ट्रीय खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. तसेच ‘एसव्हीजेसिटी’ ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी तेजस धनावडे याची शालेय राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेसाठी निवड झाली.



# ‘एसव्हीजेसिटी’ क्रीडासंकुलात राज्यस्तरीय लंगडी स्पर्धेचे आयोजन

ग्रामीण भागातील खेळ व खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी ‘रत्नागिरी जिल्हा लंगडी असोसिएशन’च्या मार्गदर्शनाखाली ‘श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट’ तर्फे दि. १६ डिसेंबर आणि १७ डिसेंबर २०१८ रोजी क्रीडासंकुलातील बंदिस्त स्टेडियमवर प्रथमच ‘बी.के.एल. वालावलकर मेमोरियल लंगडी चॅम्पियनशिप’ चे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेस नंदुरबार, वसई (पालघर), औरंगाबाद, यवतमाळ, धुळे, परभणी, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या नऊ जिल्ह्यातील एकूण २१० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. ही स्पर्धा १४ वर्ष आणि १७ वर्ष वयोगटातील मुले आणि मुली यांसाठी भरविण्यात आली. राज्यभरातील खेळाडूंनी या स्पर्धेत बंदिस्त स्टेडियमवर खेळण्याचा व त्याचबरोबर संकुलातील चॅलेंज कोर्सेसमधील साहसी खेळांचाही मनमुराद आनंद लुटला.





*लंगडी स्पर्धेतील क्षणचित्रे*

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com



**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

**पुणे व मुंबई येथून जानेवारी २०१९ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक**

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ०५ जानेवारी | डॉ. भारती खांडेकर, मुंबई (प्लॅस्टिक सर्जन) | दुभंगलेले टाळ व ओठ शस्त्रक्रिया तज्ज्ञ |
| १३ जानेवारी | डॉ. आनंद जोशी, मुंबई (गॅस्ट्रोएंट्रोलॉजिस्ट) | पोटाचे विकार |
| १३ जानेवारी | डॉ. शिवप्रसाद दाते, मुंबई (सर्जन) | भाजलेले व्रण, डाग - शस्त्रक्रिया व उपचार |
| १९ जानेवारी | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कर्करोग शस्त्रक्रिया व उपचार |
| १९ जानेवारी | डॉ. श्रीपाद बाणावली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार |
| १९ जानेवारी | डॉ. सुजाता नाईक, मुंबई (होमिओपॅथिक) | त्वचारोग तज्ज्ञ<br>सकाळी १०.०० ते १.०० वालावलकर रुग्णालय, डेरवण येथे.<br>सायंकाळी ५.०० ते ८.०० UHTC चिपळूण येथे |
| २० जानेवारी | डॉ. संजय ओक, मुंबई (सर्जन) | लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रियांचे तज्ज्ञ |
| २० जानेवारी | डॉ. के. एस. कुलकर्णी, पुणे (मानसोपचार तज्ज्ञ) | मानसोपचार |
| २० जानेवारी | डॉ. अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | किडनी विकार |
| २० जानेवारी | डॉ. के. मंजुळा, मुंबई (नेत्ररोग तज्ज्ञ) | डोळ्याच्या रेटिनाच्या विशेषज्ज्ञ व उपचार |

**दि. २६ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी २०१९ अखेर इंग्लंड येथील डॉक्टरांचे शस्त्रक्रिया शिबिर**

**डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रूग्णालय येथे भेटतील.**

**आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना श्रवण यंत्र (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे.**

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व तिसऱ्या शनिवारी वाचा-उच्चार तज्ज्ञ डॉ. विशाखा या वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.

**डोहाळेजेवण व सासू सून मेळावा** - ३० जानेवारी - RHTC व वालावलकर येथे

वालावलकर रुग्णालय येथे RHTC व वालावलकर रुग्णालय यांच्यातर्फे मुलांचे **'अर्धवार्षिक वाढदिवस'** - २८ जानेवारी, **सरपंच मेळावा** - २२ जानेवारी

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील, **संपादक मंडळ :** श्री. प्रफुल्लराव गोडबोले, सौ. शरयू यशवंतराव, श्री. श्रीकांत पराडकर